**प्रकल्प प्रवर्तक मे. बी. एस. इस्पात लिमिटेड, गाव-सालोरी, येंन्सा, पोस्ट-चोनोरा, तालुका-वरोरा, जिल्हा-चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मारकी-मांगली-३ कोळसा खाण प्रकल्प, गाव-अर्धवान, भेंडाळा, रुईकोट व मुकुटबन, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (उत्पादन क्षमता-०.२१ दशलक्ष टन/वर्षे, प्रकल्प क्षेत्र-२८२.० हेक्टर) प्रकल्पासाठी पर्यारणविषयक जाहिर सुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **०३/११/२०१८** |
| **वेळ** | : | **दुपारी १२.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **प्रकल्प स्थळ, मुकुटबन, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ** |

**प्रस्तावनाः-**

मे. बी. एस. इस्पात लि. ख. क्र. ९, १०१ व १९०, सालोरी-येन्सा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मार्की-मांगली कोल ब्लॉक-३ खुली खाण प्रकल्प, अर्धवन, मुकुटबन, भेंडाळा, रूईकोट, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ (उत्पादन क्षमता-०.२१ दशलक्ष मेट्रीक टन/वर्ष, क्षेत्र-२७५ हे.आर.) या प्रकल्पाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर, थर्मल आणि कोळसा खाण प्रकल्प मंत्रालय, नवी दिल्ली यांचा प्रकल्पाकरिताच्या पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. ३०.११.२०१५ व दि. ०१.१२.२०१६ रोजी झालेल्या ४७व्या व दि. ०७.०१.२०१६ व ०८.०१.२०१६ रोजी झालेल्या ४९व्या बैठकीमध्ये सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक मान्यता (TOR) जारी केले (सहपत्र-१) व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश आहेत.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने दि. ०३/११/२०१८ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. २९.०९.२०१८ रोजीच्या मराठी दैनिक "सकाळ" व इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये व दि. ३०.०९.२०१८ रोजीच्या दैनिक "देशोन्नती" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली.

१) पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२) सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३) प्रादेशिक व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर
४) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
५) जिल्हा परिषद, यवतमाळ
६) जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ
७) उप-विभागीय कार्यालय, केळापूर ता. केळापूर, जि. यवतमाळ
८) तहसिल कार्यालय, झरी-जामणी, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ
९) पंचायत समिती कार्यालय, झरी-जामणी, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ
१०) ग्रामपंचायत कार्यालय, मुकुटबन, अर्धवन, भेंडाळा (रूईकोट), ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ

वरील अनुक्रमांक ४ ते १० वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. अशा तऱ्हेने जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये मध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्प बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ, मुकुटबन, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाजवळचे असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

| | | |
|---|---|---|
| १) श्री नरेन्द्र फुलझेले,<br>अप्पर जिल्हा दंडाधिकारी,<br>यवतमाळ | - | **अध्यक्ष,** |
| २) श्री राजू आर. वसावे,<br>प्रभारी प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |

३) श्री प्रताप जगताप,
उप प्रादेशिक अधिकारी, - समन्वयक
मप्रनि मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. प्रताप जगताप, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीवद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक,सुचना,विचार,आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली.तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी उपस्थित जनसमुदायास . बी. एस. इस्पात लि. ख. क्र. ९७, १०१ व १९०, सालोरी-येन्सा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मार्की-मांगली कोल ब्लॉक-३ खुली खाण प्रकल्प, अर्धवन, मुकुटबन, भेंडाळा, रूईकोट, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ (उत्पादन क्षमता – ०.२१ दशलक्ष मेट्रीक टन/वर्ष, क्षेत्र – २७५ हे.आर.) प्रस्तावाबाबत प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गांने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री. देवेंद्र सोनोने व पर्यावरण सल्लागार श्री. शंतनु पुराणिक यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला.सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पावावत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पांमुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पण्या, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे:**

**१) श्री बंडु उर्फ महादेव दामू पारखी, रा. मार्की(बु.), ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | **आक्षेप /सूचना/प्रश्न/प्रश्न** | **चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १ | मी शेतकरी कुटुंबातील असून पिढ्यानपिढ्या शेती करत आहेत. माझे प्रश्न खालीलप्रमाणे नोंदवित आहे:<br>१) सदरहू कोळसा खाण प्रकल्पामुळे परिसरातील शेतातील पिकांवर वाईट परिणाम होतील,<br>२) कोळसा खाण प्रकल्पामुळे परिसरातील भूगर्भातील पाण्याची पातळी खालावेल.<br>३) यापूर्वी विरांगना कोळसा खाणीच्या जनसुनावणी दरम्यान दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात आलेली नाही. पर्यावरण विषयक अहवालात ४.० लक्ष रोपट्यांचे वृक्षरोपण करण्याचा प्रस्ताव आहे. अहवालात २८८ हे. मधील वृक्षांची गणना योग्य प्रकारे केली नाही. | १) प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की सदरहू कोळसा खाण ही पूर्वीच्या प्रकल्प प्रवर्तकांना म्हणजे मे. श्री विरांगणा स्टील प्रा. लिमिटेड यांना तिन्ही ब्लॉकसाठी संयुक्त/एकत्रित (तीन ब्लॉक /विभाग नं. २, ३ व ४, मारकी- मांगली,) पर्यावरण अनुमती प्रदान करण्यात आलेली होती. मात्र सदरहू परवानगी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने रद्द करण्यात आली व नविन प्रकल्प प्रवर्तकांना (म्हणजे बी.एस इस्पात लिमिटेड) खुल्या बोलीव्दारे लिलाव पद्धतीने शासनामार्फत प्रदान करण्यात आली.<br>२) तदनंतर नविन प्रकल्प प्रवर्तकांनी |

| | | |
|---|---|---|
| | अहवाल चुकीचा आहे त्यामुळे जनसुनावणी रद्द करण्यात यावी.<br>४) एका प्रकल्प धारकाकडून दुसऱ्या प्रकल्पधारकाकडे प्रकल्प हस्तांतरीत करता येत नाही. तरी पण मे. विरांगनाचा प्रकल्प मे. इस्पात यांना देण्यात आला आहे.<br>५) यवतमाळ जिल्हा हा उच्चप्रतीच्या कापसाच्या उत्पादनासाठी प्रसिध्द आहे. कोळशाच्या पावडरीच्या प्रदूषणामुळे ते नष्ट होईल. तसेच जनतेच्या आरोग्यावर परिणाम होईल.<br>६) प्रकल्प अहवालात नमूद केल्याप्रमाणे सिंचनक्षेत्राखालील बाधित क्षेत्र फक्त २.८१% दाखविले आहे ते चुकीचे आहे. अहवालात वन्य जीवांच्या वास्तव्याबाबत नमूद करण्यात आले नाही.<br>७) स्थानिक जनता ही विकासाच्या विरुध्द नाही. तर ती प्रदूषणाच्या विरुध्द आहे. या प्रकल्पाला माझा विरोध आहे.<br>८) प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पग्रस्तांसाठी वैद्यकीय सेवा पुरविली जाईल, तसेच रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात येईल असे अहवालात म्हटले आहे. परंतु नंतर त्याची पूर्तता करण्यात येत नाही. प्रकल्प प्रवर्तक जनसुनावणी दरम्यान दिलेल्या आश्वासनांची नंतर पूर्तता करताना दिसत नाहीत.<br>९) प्रकल्प प्रवर्तकांनी कोळसा वाहतूकीसाठी वेगळा रस्ता बांधावा.<br>१०) गावापासून १०० मीटर अंतरावर ब्लास्टींग करण्यात येणार आहे त्याचा गावकऱ्यांना त्रास होईल.<br>११) शेतकऱ्यांच्या जमीनीचे अधिग्रहण दलालामार्फत करू नये. | म्हणजेच बी.एस इस्पात लिमिटेड यांनी पूर्वीच्या प्रकल्प प्रवर्तकांना मंजूर करण्यात आलेले विविध परवाने नविन प्रकल्प प्रवर्तकांच्या नावावर करण्यासाठी अर्ज केला असता भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने नविन पर्यावरण अनुमती घेण्याची सूचना केली. त्याअनुषंगाने सदरहू जनसुनावणी होत आहे.<br>३) प्रकल्प बाधितांना प्रकल्पात त्यांच्या योग्यतेनूसार रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल.<br>४) प्रकल्प बाधितांसाठी पुनर्वसनाची योजना प्रचलित शासनाच्या धोरणानूसार पूर्णपणे राबविण्यात येईल. |

**२) श्री रविंद्र सुधाकर कुरलेवार, रा. रुईकोट, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | १) प्रकल्प प्रवर्तकांनी गावापर्यंतची अगदी ५० फुटांवर जागा अधिग्रहित केलेली आहे. रूईकोट गावाचे पुनर्वसन केल्यावरच शेतजमीनीचे अधिग्रहण करण्यात यावे व नंतर खाणकाम सुरू करावे, कोळसा वाहतूकीसाठी वेगळा रस्ता बांधावा.<br>२) प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक शेतक-यांची प्रकल्पासाठी जमिन घेतली आहे, जमिन अधिग्रहणाचा मोबदला एकरी ₹२५ लाख एवढा देण्यात यावा व प्रकल्प ग्रस्तांना रोजगाराची संधी द्यावी. जर स्थानिक रोजगार करण्यास इच्छुक नसेल तर त्याला एकरी ₹५ लक्ष अधिक मोबदला देण्यात यावा. शेतजमीनीचा व्यवहार दलालामार्फत करू नये, तसेच जमीन अधिग्रहण करण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांची नावासह यादी ग्रामपंचायत, तहसिल कार्यालयात लावण्यात यावी आणि एकमुस्त शेती खरेदी करण्यात यावी.<br>३) यवतमाळ जिल्हा हा पांढ-या सोन्यासाठी म्हणजे कापसासाठी भारतात प्रसिध्द आहे. सदरहू प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे सर्व शेतीव्यवसाय नष्ट होईल,<br>४) प्रकल्पामुळे परिसरातील भूगर्भातील पाण्याची पातळी खालावेल. आमच्या मागण्या मान्य न झाल्यास आमचा प्रकल्पाला तीव्र विरोध आहे. | १) प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की रुईकोट गावात सुरक्षिततेसाठी १०० मिटर्सवर सुरक्षितता विभाग आरक्षित करण्यात आला. जर स्थानिकांना प्रकल्पातील स्फोटांमुळे त्रास झाल्यास सुरक्षितता विभागाचे परिसर वाढविण्यात येईल.<br>२) सुरक्षितता विभाग वाढवावा लागल्यास शासकीय निर्देशांनुसार तेथे हरितपट्टा विकसित करण्यात येईल. तसेच असा प्रश्न ५-७ वर्षांनंतर येणार आहे.<br>३) सदर उपाययोजना अपूऱ्या असतील तर प्रकल्प प्रवर्तक संपूर्ण रुईकोट व मारकी बुद्रुक गावांचे पुनर्वसन करण्यास तयार आहे.<br>४) जमीन अधिग्रहणाचा मोबदला एकरी ₹ २५ लक्ष देण्यात येईल. |

**३) श्री. रमेशराव उदकवार, माजी सरपंच, मुकुटबन, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | १) नविन प्रकल्प प्रवर्तक हे पूर्वीच्या प्रकल्प प्रवर्तकांना लागू करण्यात आलेल्या अटी व शर्ती पाळण्यास बंधनकारक आहेत. | प्रकल्प प्रवर्तकांनी आक्षेपांना उत्तर देताना सांगितले की-<br>१) जमिन अधिग्रहित करण्यात आलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | मात्र नविन प्रकल्प प्रवर्तक हे जनतेची दिशाभूल करत आहेत,<br>२) नविन प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहण केलेल्या प्रकल्पबाधित शेतक-यांना प्रथम जमिन अधिग्रहण मोबदला एकरी ₹ २५/- लाख द्यावा. जमीन खरेदीचा करारनामा प्रकल्पाला परवानगी मिळण्याच्या अगोदर करण्यात यावा जेणेकरून प्रकल्प प्रवर्तक शेतकऱ्यांची नंतर दिशाभूल करणार नाही.<br>३) स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी नाकारण्यात येते तसे होऊ नये,<br>४) प्रकल्पात कार्यरत कामगारांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे,<br>५) प्रकल्प प्रवर्तकांनी कोळशाच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र रस्ता वा बायपास विकसित करावा.<br>६) प्रकल्प प्रवर्तकांनी अद्यापपावेतो स्थानिकांना कुठलीही सामाजिक सुविधा उपलब्ध केलेली नाही.<br>७) प्रकल्प प्रवर्तक कोळशाच्या धुळीचे/भुकटीचे प्रदूषण टाळण्यासाठी पाणी फवारणी करत नाही.<br>८) प्रकल्प प्रवर्तकांनी हरितपट्टा विकासाची योजना परिसरात राबविलेली नाही<br>९) स्थानिक युवक व युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांना रोजगार मिळण्यासाठी सक्षम करणे व प्रकल्पात रोजगार देणे गरजेचे आहे,<br>१०) स्थानिकांना शैक्षणिक व वैदकीय सुविधा त्वरित पुरविण्यात याव्यात,<br>११) प्रकल्प प्रवर्तकांना स्थानिक जनता या प्रकल्प परिसरात विकसित केलेला कच्चा माल परिसराबाहेरिल उद्योगास विकण्यास विरोध करणार आहे. या प्रकल्प परिसरात विकसित केलेला कच्चा माल हा येथील परिसरातील उद्योगास उपलब्ध करण्यात यावा, | शेतक-यांच्या मागणीनुसार मोबदला अदा करण्यात येईल. जर जमिन अधिग्रहण पुनर्वसन कायदा,२०१३ (लार,२०१३) मध्ये अथवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणात जर तशी तरतुद असल्यास एकरी रुपये २५/- लाख (रुपये पंचवीस लाख) मोबदला अदा करण्यात येईल,<br>२) नविन रस्ता कोळशाच्यावाहतुकासाठी बांधण्याचे हमी बैठकीत देता येत नाही. स्थानिकांच्या भावना प्रकल्पाच्या वरिष्ठ प्रशासनास त्वरित कळविणयात येतील.<br><br>पर्यावरण सल्लागार यांनी बैठकीत माहिती दिली की-<br>२) प्रकल्प प्रवर्तकांचा एक कार्यरत स्टील उद्योग वरोरा येथे कार्यरत आहे. तेथील स्टील उत्पादनासाठी येथील कोळसा पाठविण्यात येईल. मात्र कोळशात राखेचे प्रमाण जास्त असल्याने प्रकल्प प्रवर्तकांचा याच परिसरात कोल वॉशरी प्रकल्प कार्यान्वित करण्याचा मानस आहे.<br>३) अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की प्रकल्प प्रवर्तकांना आधारित प्रकल्प परिसरात हाती घ्यावे,<br>४) प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की सदरहू स्टील प्रकल्प वरोरा येथे पुर्वीपासून कार्यरत आहे व कोळसा ब्लॉक उद्योग नुकताच प्रदान करण्यात आलेला आहे. परिसरातच कोल वॉशरी कार्यरत करण्यात येणार असून स्थानिक युवक युवतींना शैक्षणिक योग्यतेनूसार रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | पुढील प्रक्रिया उद्योग याच परिसरात व्हावेत.<br>१२) प्रकल्प प्रवर्तकांनी सदर कोळसा खाणीतील कोळसा, वरोरा येथील स्टील कंपनीला देणार आहोत याबाबत स्थानिकांना यापूर्वी अवगत केले नसून ही आमची फसवणूक आहे.<br>१३) कादर शेख नावाची व्यक्ती यांना पूर्वीच्या प्रकल्पाने दिलेल्या मोबदल्याऐवजी आज घोषित केलेला मोबदला देण्यात यावा. तसेच त्यांच्या मुलास रोजगाराची संधी देण्यात यावी.<br><br>तसेच प्रकल्प प्रवर्तकाने ₹ २५ लक्ष प्रति एकर देण्याचे जाहीर केल्याप्रमाणे त्याबाबत अगोदर करारनामा करण्यात यावा. | |

**४) श्री ओमप्रकाश अनंतराव तेलंग, रा. मांगली, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | झरी-जामणी तालुक्यातील विद्यार्थ्यांना रोजगारासाठी कौशल्य प्रशिक्षण योजना राबवून त्यांना रोजगार मिळण्यासाठी सक्षम करणे गरजेचे आहे. त्यासाठी योजना त्वरित करुन अंमलात आणावी. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | त्यांनी सूचना केली की परिसरात योग्य पाऊस न झाल्याने मांगली गाव हे दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्या यावे. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांने सांगितले की सदहू समितीची कार्यकक्षा वेगळी असून तीस तो अधिकार नाही. |

**५) श्री संतोष हनुमंतराव कुरमेलवार, राहणार-**

| अ. क्र. | सूचना | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प बाधित शेतक-यांना जमिनीचा मोबदला म्हणून ₹२५ लाख एकरी त्वरित देण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रकल्पात ७०% रोजगार हे स्थानिकांसाठीच राखीव ठेवण्यात यावे. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्यात यावे. त्यांनी सांगितले की ते प्रकल्पाच्या विरुध्द नसून स्थानिकांना प्रकल्पाचा त्रास होऊ नये. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

६) श्री. रमेश माधवराव पैलवार, रा. हिरापूर,

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावातील इतर काही जण पूर्वी याच प्रकल्पात कामावर होते. सदरहू प्रकल्प बंद झाल्याने आम्हाला नोकरीवरुन कमी करण्यात आले. सदरहू प्रकल्पाबाबत मला काम करण्याचा अनुभव असून नविन प्रकल्प प्रवर्तक मला रोजगाराची संधी देतील काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की जुन्या कामगारांना रोजगाराची संधी देण्याचे अग्रक्रम राहील. |

७) श्री. शाम भोजपुरवार, रा. अर्धवान, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पातील उत्पादनामुळे एखाद्या शेतक-याच्या शेतातील पिकाचे नुकसान झाले तर त्या नूकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात येणार का? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, नूकसानग्रस्तांचा सर्वेक्षण करून नियमाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येईल. |

८) श्री चंद्रकांत दशरथ गुगल, उपसरपंच, लहान पांढरकवडा:-

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जे शेतकरी प्रकल्पासाठी जमिनी देतील, त्यांना एकरी ₹ २५ लाखाप्रमाणे मोबदला देण्याचे प्रकल्प प्रवर्तकाने मंजूर केले असून ते ईतिवृत्तात नमूद करावे. तसेच यापूर्वी मे. टॉपवर्थने ₹ २.५ ते ₹ ३.० लक्ष ने खरेदी केली आहे. त्यांनाही ₹ २५ लक्ष प्रती एकर मोबदला देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर विषय त्यांच्या अखत्यारीत येत नाही. |
| २) | उत्पादक उत्पादनाची रॉयल्टी ही जिल्हा खनिकर्म विभागास हस्तांतरित करतात. तरी सदरहू रॉयल्टी रकमेतून काही रक्कम ही प्रकल्पग्रस्तांसाठी खर्च करण्यात यावी. | सदरहू सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | प्रकल्पग्रस्त वा त्यांच्या वारसदारांना कोणत्या संवर्गात रोजगार उपलब्ध करण्यात येईल? त्यांना रोजंदारीवर काम देण्याय येईल वा प्रकल्पात कायमस्वरुपी रोजगार देण्यात येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पातून २८८ रोजगार निर्मीती होणार असून २६० तांत्रिक व २० अतांत्रिक रोजगार आहेत. नियमानूसर व योग्यतेनूसार स्थानिकांना प्रशिक्षित करून रोजगार देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. |

९) श्री जयंत सोमेश्वर उध्धतवार, रा.मार्की

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सार्वजनिक रस्ता प्रकल्प प्रवर्तक मे. टॉपवर्थ यांच्याकडून केंव्हा दुरुस्त करण्यात येईल याबाबत विचारणा केली. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत मत मांडले की सदरहू बाब ही प्रकल्प अधिका-यांच्या कार्यकक्षेत येत नाही. याबाबत लेखी आक्षेप जिल्हा प्रशासनाकडे नोंदविण्याचे सूचना केली. |
| २) | प्रकल्प प्रवर्तक मे. टॉपवर्थ यांनी कुठलीही सामाजिक कल्याणकारी योजना हाती घेतलेली नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी प्रशिक्षण केंद्र त्वरित सुरु करण्याचे व स्थानिकांना रोजगाराची संधि देण्याचे आवाहन केले. | प्रकल्प प्रवर्तकांचे पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की प्रकल्प प्रवर्तकांचा व्यावसायिक प्रशिक्षण योजना व कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचा मानस आहे. त्या प्रशिक्षणासाठी प्रकल्पग्रस्तांच्या वारसदारांची प्रतिक्षायादी तयार करण्यात येईल. जनसुनावणीचे समन्वयक यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी ही मे. टॉपवर्थ या उद्योगाची नसून त्याबाबत येथे प्रश्न उपस्थित करू नयेत. |
| ३) | कोळसा वाहतुक करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाची प्रकल्प प्रवर्तकांनी पूर्व परवानगी घेतली का? त्याचप्रमाणे भविष्यात अपघात टाळण्यासाठी काही योजना आखली का? प्रकल्प प्रवर्तकांनी कोळसा वाहतूकीसाठी स्वतंत्र रस्ता बांधावा व सदर बाबीची ईतीवृत्तात नोंद घ्यावी. प्रदूषणाचे नियम प्रकल्प प्रवर्तक पाळत नसतील तर त्यावर कारवाई करणार का? | प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की यापुढे अपघात टाळण्यासाठी रात्रीच कोळशाची वाहतुक करण्यात येईल. |
| ४) | पावसाळ्यात जर प्रकल्प प्रवर्तकांनी प्रक्रिया न केलेले औद्योगिक व घरगुती सांडपाणी बाहेर सोडल्यास परिसरातली गुरांना धोका होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रक्रियाकृत सांडपाणी खाणीच्या बाहेर सोडण्यात येईल. |

१०) श्री. नेताजी पारखी, रा. मुकुटबन, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळः-

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शासनाने अशी व्यवस्थाच विकसित करावी की शेतक-यास स्वतःच्या शेतातील कोळसा/खनिज स्वतःच काढता येईल. ते काढण्याचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था | सदर सूचनेची नोंद घेण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | करावी. | |
| २) | रोजगार निर्मीती व नोकरीबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पग्रस्तांसाठी जाहिरात प्रकाशित करावी. त्यात पद, शैक्षणिक अहर्ता, वेतन यांचा उल्लेख असावा. तसेच स्थानिकांना याबाबत अवगत करण्यात यावे. | सदर सूचनेची नोंद घेण्यात येत आहे. |
| ३) | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात चंद्रपूरचे तापमान हे चुकीचे दाखविले आहे. त्याचप्रमाणे नायट्रोजन व कार्बन-डाय-ऑक्झायिड यांचे प्रमाण दिशाभूल करणारे दाखविले आहे. त्याचप्रमाणे फ्लोराईड नियंत्रण करण्याच्या कुठल्याही उपाययोजना अहवालात नाही. जे स्थानिक ऑरगॅनिक शेती करतील, त्यांना मानसिक बळ व प्रोत्साहन देण्यात यावे. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑरगॅनिक शेतीबाबतच्या सूचनेचे स्वागत केले. |
| ४) | प्रकल्प प्रवर्तकांनी भविष्यातील वाहतुक व्यवस्थेची योजना तयार करावी. त्याचप्रमाणे कोळशाच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र रस्ता करावा व त्यानंतरच खाण चालु करण्याचा परवाना देण्यात यावा. ट्रक्सच्या डेपोसाठी वेगळी जागा विचारात घेऊन योजना बनवावी व संबंधित सक्षम प्राधिक-यांकडून त्यास मान्यता घेण्यात यावी.<br>कोळसा खाणीच्या उत्खननाने आजु-बाजूच्या शेतात पाणी जाऊन शेतीचे नूकसान होते. सदर जमीन खरेदी झाला नसेल तर अनुकंपा तत्त्वान्वये नूकसानग्रस्त शेतकऱ्याला दरवर्षी सरासरी उत्पादना इतकी भरपाईची रक्कम देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, वाहनतळाची व्यवस्था करण्यात येईल. तसेच वाहनांचे योग्य प्रकारे नियमन करण्यात येईल. |
| ५) | सार्वजनिक रस्ता हा पूर्णपणे खराब झालेला आहे. ग्रामपंचायतीने सदरहू रस्ता दुरुस्त करावा व त्यासाठी लागणारा निधी हा संबंधित प्रकल्पाच्या सीएसआर निधीतून करण्यात यावा. सीएसआर फंडाचे ऑडीट ग्राम पंचायतीमार्फत करण्यात यावे. सीएसआर फंडाची रक्कम वाढविणे आवश्यक असून वाढीव रक्कमेतून प्रदूषणामुळे बाधित झालेल्या लोकांना नूकसान भरपाई देण्यात यावी. खाणीमध्ये | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सीएसआर फंडाचा वापर योग्यरीत्या करण्यात येईल. तसेच ऑडीट ग्राम पंचायतीमार्फत करण्यात येईल व ४-५ वर्ष जूने झाडांची लागवड करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | ऊंच वृक्ष लावण्याची, 4-5 वर्षे झालेले वृक्ष लावण्याची सूचना केली. | |
| ६) | प्रकल्प प्रवर्तक फक्त १८ वर्षे खाणी कार्यरत ठेवणार आहेत. त्यानंतर त्याची मालकी कोणाकडे राहणार? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, १८ वर्षांनंतर सदरहू भूखंड शासनास हस्तांतरीत करण्यात येईल. |

**११) श्री सुनंदन रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबादः-**

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | प्रकल्पास पाठिंबा असल्याचे सांगितले. |

**१२) श्री गजानन मुकुटवार, राहणार -**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहण केलेल्या शेतक-यास मोबदला व रोजगार मिळेल. पण शेती नष्ट झाल्याने बेकार झालेल्या शेतमजुराच्या पुनर्वसनाची काही योजना आहे काय? | सदर सूचनेची नोंद घेण्यात येत आहे. |
| २) | यवतमाळ जिल्ह्यात ब-याचठिकाणी खाणीचे प्रकल्प चालू आहेत. त्यामुळे एखाद्या दिवशी मुकुटबन गावास भूस्खलन होईल. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, त्यांच्याकडे त्याबाबत शासनाने मंजूर केलेली पुनर्भरण योजना असून खाणीचा खड्डा हा ८७% भरता येऊ शकतो व भविष्यात भूस्खलन होणार नाही. |
| ३) | प्रकल्प प्रवर्तक फक्त १८ वर्षे खाण कार्यरत ठेवणार आहेत. त्यानंतर त्याची मालकी कोणाकडे राहणार? | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, १८ वर्षांनंतर सदरहू भूखंड हा शासनास हस्तांतरित करण्यात येतो. |

**१३) श्री संतोष निलकांत ढेंगळे, रा. मार्की, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळः-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पासाठी परिसरातील सर्वच जमिन प्रकल्प प्रवर्तकांनी विकत घ्यावी. तुकड्या तुकड्याने विकत घेऊ नये. संपूर्ण भूखंड विकत घ्यावा. जर एखादा भूखंड अर्धाच घेतला असेल तरी उर्वरित शेतीवर खाणीतीन प्रदूषणामुळे उत्पन्न होत नाही. पाण्याची टंचाई वाढते व उरलेल्या जमीनीचा काही उपयोग होत नाही त्याकरिता | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रकल्पास शासनाकडून जे भूखंड लीजवर मिळाले आहे त्यातच काम करण्यात येईल. शेतीचे नूकसान झाले तर त्याची शास्त्रीय पध्दतीने सर्वेक्षण करून नूकसान भरपाई देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्प प्रवर्तकाने संपूर्ण भूखंड खरेदी करावे. | |
| २) | प्रकल्पामुळे भूगर्भाची पाणी कमी होईल काय ? | प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की पाण्याची पातळी/पाणी कमी होऊ शकते. मात्र भारत सरकारच्या आदेशानुसार जल सुरक्षितता योजना तयार करण्यात आलेली आहे.<br>त्यांनी अर्धवान गावातील पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत, सिंचनासाठी पाणी व पशुंना आवश्यक असलेले पाणी याची सद्दस्थिती व २५ वर्षांची गरज याबाबत अभ्यास करून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने पूर्तता करण्या करिता व्यवस्थापन या आहवालात अंतर्भूत असल्याचे स्पष्ट केले. |

**१४) श्री आशिष फुलसंगे, रा. लहान पांढरकवडा, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप |
|---|---|
| १) | परिसर हा धुळीच्या प्रदूषणाचा बाधित असल्याचे विचार मांडले. याबाबत मप्रनि मंडळ कुठलीही कारवाई करत नाही असे मत मांडले. त्याचप्रमाणे बाधितांना कशाप्रकारे मोबदला द्यावा याबाबत मप्रनि मंडळ कुठलाच निर्णय घेत नसल्याचे मत मांडले.<br><br>परिसरात बरेच तरुण हे बेरोजगार आहेत. त्याचप्रमाणे प्रकल्पासाठी शेतजमिनीचे अधिग्रहण झाल्यावर तरुण शेतमजुर बेकार होणार. त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कौशल्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.<br><br>तसेच शेतीची रजिस्ट्री करताना शेतीची किंमत ₹२५ लक्ष प्रति एकर सरकारी दस्ताऐवजांवर नमूद करण्यात यावी. |

**१५)श्री प्रकाश मेकालवार, माजी सरपंच, अर्धवन, ता. झरी-जामणी, जि.यवतमाळ:-**

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. |
| २) | स्थानिकांना प्रकल्प प्रवर्तकांकडून योग्य प्रकारची वागणुक मिळत नाही.<br>प्रकल्प प्रवर्तकांच्यानुसार रस्ते बांधणे हे सार्वजनिक बांधकाम खात्याचे काम आहे. जर प्रकल्प प्रवर्तकांनी रस्ता संपूर्णपणे खराब केला असेल तर ते त्यांनीच दुरुस्त करायला हवा. स्थानिकांच्या भावनांचा प्रकल्प प्रवर्तकांनी विचार करावा. |
| ३) | संबंधित बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देण्यात यावे, |

१६)श्री आझाद दुधतवार, मु.पो. मार्की(बु.), ता. झरी-जामणी, जि.यवतमाळः-

| अ. क्र. | आक्षेप |
|---|---|
| १) | शेतजमिनीच्या मालकास मोबदला मिळेल. पण शेतावर काम करणा-या शेतमजुरांना काहीही मिळणार नाही. म्हणजे ५०% लोकांना काहीही मिळणार नाही. |

१७)श्री. अनिल तेलंग, कोळसा खाण प्रकल्प संघर्ष समितीः-

| अ. क्र. | सूचना | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | काही वर्षापुर्वी येथे बीएस इस्पात नावाची कंपनी आली होती व त्यांचा खाण प्रकल्प सुरु करण्याचा विचार होता. त्यांच्या अहवालात त्यांनी ४०० लोकांना रोजगार देण्याची व त्यात ३६० कुशल व ४० अकुशल व्यक्तींना रोजगार देण्याचे त्यांचे वचन दिले होते. आताच्या प्रकल्पात रोजगार ३०० च्या आसपास आलेला आहे. त्याचप्रमाणे निरीनेही सदर प्रकल्पाबाबत आक्षेप घेतले होते. त्या प्रकल्प अहवालात पार्टीकल ऑफ व्हेलॉसीटीचा जो फॉर्मुला वापरला होता तो कोठेही आढळला नाही. सदरहू प्रकल्प ६५ गावांच्या क्षेत्रात होणार होता. भारत सरकारने या क्षेत्रातील खनिजांचे सर्वेक्षण केले असून त्यात कोळसा व तांबे हे खनिज असल्याचे लक्षात आल्याने त्या हव्यासापोटी प्रकल्प येत आहेत. सदर क्षेत्रात जमीनीचे दर कमी असल्यामुळे उद्योग येत आहेत. सन २००४ मध्ये बी.एस.इस्पातची जनसुनावणी रद्द करण्यात आली होती. त्यावेळच्या प्रकल्प अहवालात काय सुधारणा केल्या आहेत याची माहिती देण्यात यावी.<br><br>जमीन अधिग्रहण कायदा, २०१३ अन्वये जमीन अधिग्रहण करण्यात येईल काय? | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, या पूर्वीच्या प्रकल्पाबाबतची स्थिती लक्षात न घेता आता हा एक नविन प्रकल्प आहे, या दृष्टीकोणतून पूर्ण अभ्यास केला असून त्यानूसार ही जनसुनावणीची कार्यवाही होत आहे. |
| २) | खाणीत होणाऱ्या स्फोटाच्या प्रक्रियेमुळे फोटो सिंथेसिस प्रक्रिया होत नाही. त्यामुळे कापसाच्या उत्पन्नाचे प्रमाण कमी झालेले आहे. खाणीत स्फोट करताना, कोळसा | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पात पाणी शिंपडणारे मशिन, फॉगर व्यवस्था कार्यान्वित करण्यात येणार आहे, त्यामुळे कोळशाचे प्रदूषण होणार नाही. तसेच वृक्ष लागवड करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | वाहतूक करताना प्रदूषण न होण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आलेली आहे? | |
| ३) | कोळशाचे उत्पादन करण्यासाठी भारतीय तंत्रज्ञान वा जर्मनी तंत्रज्ञान यातील कोणते तंत्रज्ञान वापरणार? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, भारतीय तंत्रज्ञान कार्यान्वित करणार असल्याचे स्पष्ट केले. |
| ४) | भारतीय तंत्रज्ञानामुळे तेथे प्रदूषण होण्याची जास्तच शक्यता आहे. शेतातील पिकांचे नुकसान होईल. प्रकल्प प्रवर्तकांकडे वातावरणातील धुळीची घनता कमी करण्याची सयंत्रणा नाही. त्यांनी असे मत मांडले की स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीचा प्रकल्प प्रवर्तकाकडून योग्य मोबदला मिळाल्यानंतरच जमीनी हंस्तांतरीत कराव्यात.<br><br>सदर प्रकल्प नवीन नसून जुनाच आहे.<br><br>प्रारूप अहवालावर जनसुनावणी न घेता ती अंतिम अहवालावर घेण्यात यावी अशी सूचना केली. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसारच अहवाल तयार करण्यात आलेला असून बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊनच अंतिम अहवाल बनविण्यात येतो व सदरहू अंतिम अहवालात स्थानिकांच्या सूचना, आक्षेपांचा समावेश करण्यात येईल. |
| ५) | प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येतच खडक डोह असून प्रकल्पातील धुळीमुळे पिण्याचे पाण्याचा स्त्रोत हा पूर्णपणे खराब होईल.<br><br>सदर प्रकल्पात चारगांवचा समावेश असून भविष्यात प्रकल्पाचे विस्तारीकरण होईल त्यावेळी धरण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खडक डोह धरण हे प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येत असून प्रकल्पातील प्रदूषणाचा धरणाच्या पाण्यावर कुठलाही परिणाम होणार नाही. |

**१८) श्री वासुदेव लक्ष्मणराव विधाते, रा. मार्की, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा चुकीचा असून शासनाची व सामान्य जनतेची दिशाभूल करणारा आहे. सदरहू अहवाल हा प्रकल्प प्रवर्तकांना मंजूर केलेल्या टर्म्स ऑफ रेफरन्सप्रमाणे नाही. ते म्हणाले की बैठकीत नुकतेच पर्यावरण सल्लागार यांनी असे | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची उप विभागीय कार्यालयात व इतर शासकीय कार्यालयात सादर केलेल्या प्रतीची छांयाकित प्रत दाखविली. त्यावर प्रशासनाच्या स्वाक्ष-या होत्या. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांना उपलब्ध |

| | | |
|---|---|---|
| | सांगितले की खडक डोह सिंचन प्रकल्पावर प्रदूषणामुळे काहीही परिणाम होणार नाही. खडक डोह धरण हे प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येतच येतो असे असूनही सदरहू विधान प्रकल्प प्रवर्तक यांनी केलेले आहे. तरी सदरहू अहवाल हा दिशाभूल करणारा आहे व सदर अहवाल अवैध ठरवून सदरहू बैठक रद्द करुन नविन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. उप-विभागीय कार्यालय, झरी-जामणी येथे शासन व सामान्य जनतेस उपलब्ध करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालात असलेल्या टर्म्स ऑफ रेफरन्सवर कोणाचीही स्वाक्षरी नाही. तरी सदरहू अहवाल हा बेकायदेशीर अहवाल म्हणून घोषत करावे. | करण्यात आलेल्या अहवालाच्या प्रतींवर स्वाक्षऱ्या असल्याचे निदर्शनास आले. |
| २) | प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी मप्रनि मंडळास दिनांक ०९.०८.२०१८ रोजी प्रस्ताव सादर केला. प्रस्ताव सादर केल्यानंतर ४५ दिवसातच पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठक आयोजित करणे बंधनकारक असूनही बैठक ७० दिवसांनी आयोजित करण्यात आलेली आहे. हे पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेचे पूर्णपण उल्लंघन आहे. तसेच म.प्र.नि. मंडळाला अर्ज केल्यापासून ४५ दिवसानंतर जनसुनावणी घेण्याचे अधिकार नाहीत.<br>त्यामुळे सदरहू जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे. मप्रनि मंडळ व पर्यावरण सल्लागार हे महसुल प्रशासनाची व सामान्य जनतेची दिशाभूल करत आहेत. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदरहू बाबीची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| ३) | शासनाने मंजूर केलेला संपूर्ण टीओआर जनतेस उपलब्ध करण्यात आलेला नाही. त्यातून अनुक्रमांक १ ते ४ वगळण्यात आलेले आहेत. याचा अर्थ सामान्य जनतेसाठी काही माहिती ही लपविण्यात आलेली आहे. तरी याबाबत संबंधित व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.त्यांनी पुढे आक्षेप नोंदविली की पर्यावरण सल्लागार यांनी तयार केलेला | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की त्यांना उपलब्ध करण्यात आलेल्या प्रतींमध्ये तसेच येथे उपलब्ध करण्यात आलेल्या प्रतींमध्येही टर्म्स ऑफ रेफरन्समधील कुठलाही भाग वगळण्यात आलेला नाही. |

| | | |
|---|---|---|
| | अहवाल हा पुर्णपणे चुकीचा व दिशाभूल करणारा आहे.<br>तसेच सदर जनसुनावणीतील मुद्दे घेऊन अंतिम अहवाल बनविण्यात येतो असे सांगण्यात येते परंतु जनसुनावणी दरम्यान उपस्थित केलेले मुद्दे अंतिम अहवालात नमूद करण्यात येतात की नाही हे आम्हाल कळविण्यात येत नाही. अंतिम अहवाल जनतेकरिता उपलब्ध करून देण्यात यावा. | |
| ४) | १) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात परिसरातील वनस्पती व विशिष्ट कालखंडातील प्राणीजात (फ्लोरा व फौना) याचा उल्लेख नाही. प्रकल्प परिसरात वाघाचे अस्तित्व असताना नमुद करण्यात आलेले नाही. वाघ हा प्राणी अनुसुची-1 मध्ये घोषित करण्यात आलेला असून त्याचे अस्तित्व हे १० कि.मी. परिघात आहे. त्याबाबत काहीही माहिती अहवालात नाही. त्यासाठी सक्षम प्राधिकरणाचे/ वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र अहवालात जोडलेले दिसत नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पाच्या क्षेत्रात वन जमीन येत नसल्यामुळे त्याविभागाच्या परवानगीची गरज नाही. तसेच वाघाच्या अस्तित्वाबाबतच्या मुद्याची नोंद घेण्यात येईल. |
| | २) प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात दुस-या राज्याची-तेलंगण राज्याची हद्द येत असल्याने पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार दुस-या म्हणजे , तेलंगण राज्याची हद्द येत असल्याने तेलंगण राज्यात जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे. तेलंगण राज्यातील जनसुनावणी प्रक्रिया पुर्ण झाल्यावरच सदरहू प्रकल्पास मान्यता देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पाचे क्षेत्र हे महाराष्ट्र राज्यात असून पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेद्वारे जनसुनावणी फक्त महाराष्ट्र राज्यातच घेण्यात आली असून तेलंगणा राज्यात जनसुनावणी घेण्याचा प्रश्न उदभवत नाही. |
| | ३) त्यांनी असे मत मांडले की झरी-जामणी तालुका परिसरात ब-याच कोळसा खाणी व सिमेंट उद्योग कार्यरत असून सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील भूगर्भतील पाण्याची पातळी ही बरीच खाली गेलेली आहे. तसेच सदर परिसरात पूर्वीच्या खाणमालकाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कलेली नसून त्यामुळे भू-जल | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जल सुरक्षितता योजना भारत सरकारच्या निर्देशांनुसार तयार करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पातळी खालावू नये याकरिता प्रकल्प प्रवर्तकाने आखलेल्या उपाययोजनांवर कसा विश्वास ठेवायचा? तसेच सदर बाब स्थानिक प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेली असून स्थानिक प्रशासन सुद्धा दुर्लक्ष करते.<br><br>प्रकल्प प्रवर्तकाने सांगितल्याप्रमाणे एकरी ₹ २५ लक्ष जमिनीचा मोबदला देण्यात यावा. | |
| | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात पान क्रं. ८ मध्ये कॉलम क्रं. ७ मध्ये परिसरातील खाजगी जमिनी, शेतीच्या जमिनी व पडीक जमिनी (वेस्टलँड) याची माहिती दिलेली असून परिसरात शेतजमिनी ह्या शून्य दाखविण्यात आलेल्या आहेत. याचा अर्थ सर्व जमिनी ह्या खाजगी जमीनी आहेत असे समजावे का? याबाबत चुकीची माहिती अहवालात दिलेली आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, याबाबत पान नं. ८ व ९ वर संपूर्ण माहिती देण्यात आलेली असून शेतीची जमीन ही खाजगी जमीनीत अंतर्भूत केलेली आहे. तरीदेखील आवश्यकता वाटल्यास ते पुन्हा तपासण्यात येईल. |

**१९) श्री. तुकाराम पांडुरंग आढे, रा.भेंडाळा, ता. झरी- जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | भेंडाळा, अर्धवन व रूईकोट येथील जमीन एकत्रित घ्यावे. पूर्ण गावाची जमीन एकाचवेळी घेण्यात यावी. |

**२०)श्री राहुल सराफ, रा. बालाजी वार्ड, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मुकुटबनमध्ये पुर्वी करण्यात आलेले जमिन अधिग्रहण अत्यंत चुकीच्या पध्तीने झालेले आहे. जर पकल्प प्रवर्तक शेतक-यांच्या इच्छेप्रमाणे पंचवीस लाख प्रति एकर मोबदला देण्यास तयार असेल तर याठिकाणी तिघांतही करार होणे आवश्यक आहे. (प्रकल्प प्रवर्तक, संबंधित शेतकरी व जिल्हा प्रशासन) व तो जनसुनावणीचे ईतिवृत्त पाठविण्याच्या अगोदरच करण्यात | सदरहू सुचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | यावा व नंतर अहवाल पाठविण्यात यावा. तरच ते वैध होईल. त्याचप्रमाणे शासनाच्या जमिन अधिग्रहण पुनर्वसन कायदा, २०१३ वा इतर नियमांना प्राधान्य देण्यात यावे. | |
| २) | जमिन अधिग्रहणाबाबतची माहती कुठल्याही वृत्तपत्रात/ग्रामपंचायतमध्ये सर्व्हे नंबरसहित नावे प्रकाशित झालेली नाही. सदर माहिती ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध करून देण्यात यावी व पारदर्शक व्यवहार करण्यात यावा. एखाद्या गावाची ७५% जमीन अधिग्रहण करण्यात येत असेल तर उर्वरित जमीनीचेदेखील आपण अधिग्रहण करावयास पाहिजे व त्याचबरोबर संपूर्ण गावाचे पुनर्वसन केले पाहिजे. जमीन अधिग्रहण एकाचवेळी करण्यात यावे. त्याचप्रमाणे करार झाल्यावर संबधित शेतक-यास मिळालेला मोबदल्याचा धनादेश, जमिनीचा सर्व्हे नंबर याची संपूर्ण माहिती सामान्य जनतेस उपलब्ध करणयात यावी. सदरहू प्रक्रियी ही कालबध्द असावी. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | प्रकल्पग्रस्तांच्या वारसदारांचा प्रकल्पात रोजगाराचा हक्क अबाधित ठेवावा व जमीन अधिग्रहणाबरोबरच नौकरी द्यावी. तसेच नौकरी देणार नसाल किंवा प्रकल्पग्रस्त नौकरी करणार नसेल तर त्याबाबत आपले काय प्रयोजन आहे? | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | रोजगार हा शैक्षणिक अर्हतेप्रमाणे देण्यात यावा. दिव्यांगाच्या धोरणास कुठलाही बदल करण्यात येऊ नये. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | कोळसा वाहतुकीसाठी ताडपत्री बांधण्याऐवजी बंद ट्रक्समधूनच कोळसा वाहतुक करण्यात यावी. | सदरहू सूचनेचे स्वागत करण्यात आले. |
| ६) | जर कोळसा खाण ही १८ वर्षे कार्यरत राहणार आहे. तर प्रकल्प प्रवर्तक फक्त पाच वर्षाचा विमा कामगारांना कसा देऊ शकतो? तो कोळसाखाणीच्या अस्तित्वाप्रमाणेच असावा. तसेच सामाजिक दायित्व म्हणून गावकऱ्यांचाही १८ वर्षांचा विमा उतरवावा. | सदरहू सूचनेचे स्वागत करण्यात आले. |
| ७) | रॉयल्टी व सीएसआर निधी हा कोळसाच्या | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | उत्पादनाच्या प्रतिटन असावा. सदरहू निधी ग्रामपंचायतीस सामाजिक उपक्रमासाठी उपलब्ध करण्याय यावा. त्यांनी स्थानिक युवक युवतींसाठी प्रशिक्षण केंद्र व कौशल्य विकास अभ्यासक्रम त्वरित करावे. भूमीपुत्रासाठी सर्व कामात ५०% आरक्षण ठेवावे.<br>खाण प्रकल्प बंद झाल्यावर त्यावर म.प्र.नि. मंडळाने सूचित केलेल्या वृक्षांच्या प्रजातीची वृक्ष लागवड करावी.<br>प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रकल्प बंद झाल्यावर ती जमीन मूळ मालकाला देणार याबाबत करारनाम्यात उल्लेख करावा. | |
| ८) | म.प्र.नि. मंडळ प्रदूषणकारी उद्योगधंद्यांची बँक हमी जप्त करते. मात्र आता त्यापेक्षा जास्त कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ९) | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा योग्यप्रकारे करण्यात आलेला नाही. बफर झोन दाखविण्यात आलेला नाही. अहवालातील पान नं. २६ वर भविष्यात कोल वॉशरी कार्यान्वित करण्याचा उल्लेख आहे. परंतु त्यासाठी कालावधी, अंदाजपत्रक व जागा याचा उल्लेख नाही. तसा उल्लेख अंतिम अहवालात करण्यात यावा. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**२१) श्री. विजय अंनतराव पितुरकर, रा. मार्की-मांगली, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जर कोळसा खाणीचे आयुष्य हे फक्त १८ वर्षाचे आहे. तर खाण बंद झाल्यावर ज्यांनी खाणीचा विकास केले, त्या कामगारांनी काय करावे?. त्या कामगाराचे भविष्य काय राहणार आहे? त्यांना काही पेन्शन योजना व त्यांच्या उदरनिवार्हासाठी काही रक्कम देण्याची योजना आहे काय? तसेच भूमीहीन, बलुतेदारबाबत काय भूमिका आहे? त्याचप्रमाणे १९८ हेक्टरच्या बदल्यात फक्त २८८ रोजगार ही | सदर सूचनेचे स्वागत करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | संख्या कशी काढण्यात आली? प्रकल्पामुळे अप्रत्यक्ष रोजगारीवर वाढ होणार, त्याचा अभ्यास होणे महत्वाचे आहे व त्याचा उल्लेख अहवालात करण्यात यावा. | |
| २) | सदरहू बैठक ही पर्यावरणासाठी आहे. तर त्यात सर्व बाबींचा समावेश होणे गरजेचे आहे. कोळसा खाणी प्रकल्पाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मानवावर, प्राणीजीवनावर व पिकांवर परिणाम होत आहे. स्थानिकांचा असा अनुभव आहे की मानवाच्या व प्राण्यांच्या प्रजननक्षमतेवर परिणाम होत असून तरी पर्यावरण अभ्यास समितीवर शेतकी व पशुसवर्धन व आरोग्य विभागाचे तज्ञ असणे आवश्यक आहे.<br>नाला डायवर्शन, अधिभार ढिगाऱ्यांमुळे जे नाले बंद होतील/नवीन तयार होतील याबाबत अहवालात माहिती दिलेली नाही. भूस्खलनाबाबत करावयाच्या उपाययोजनाबाबतची माहिती प्रकल्प अहवालात सामाविष्ट केलेली नाही.<br>जमीन अधिग्रहण व पुनर्वसन कायदा, २०१३ची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात प्रकल्पाचा सार्वजनिक आरोग्यावर काय परिणाम होईल व आरोग्य केंद्रांबाबत उल्लेख नाही. स्थानिक हे प्रकल्पाच्या विरुध्द नाहीत. पण प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, प्रकल्पात रोजगाराची संधी हे घटनेने दिलेले अधिकार याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे याचा उल्लेख अहवालात हवा. मासेमारीच्या संबंधात निर्माण होणाऱ्या प्रश्नाचा उल्लेख अहवालात नाही असे सर्व मुद्दे प्रकल्प अहवालात नमूद करून नंतर जनसुनावणी घेण्यात यावी. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की अहवालात प्राण्यांवर परिणाम व विमाछत्र याबाबत उल्लेख करण्यात यावा. त्याचप्रमाणे सार्वजनिक नाला, तलाव मासेमारीसाठी वापरत असतील तर त्याची माहिती अहवालात अंतर्भूत करण्यात यावी. |

**२२)श्री शंकर दत्तात्रय लाकडे, सरपंच, मुकुटबन, ता. झरी- जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदरहू प्रकल्पामुळे जर काही अपघात वा दुष्परिणाम होणार असेल, तर तो प्रथम मुकुटबन रहिवाशांना होणार आहे. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिक जनता ही औद्योगिक विकासाच्या विरुध्द नाही. पण त्यांच्या हक्कांना बाधा येऊ नये. प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली आश्वासने पूर्ण करावीत. मुकुटबनच्या रहिवाशांना सामाजिक सुविधा पुरविण्यात याव्यात. | |
| २) | प्रकल्पात उत्पन्न होणारे औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया करुन ते जवळील मामा तलावात सोडण्यात यावे. कारण मामा तलावावर चालणा-या मासेमारीवर सुमारे २००० कुटुंबे जगत आहेत. तसेच तलावात पाणी असल्यास आमच्या गावाला पाण्याची समस्या उदभवत नाही. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | प्रकल्पातील धुळीच्या प्रदूषणामुळे मुकुटबनचे रहिवाशांना त्रास होऊ शकतो. तरी त्यांच्यासाठी आरोग्यसेवा व रुग्णवाहिका पुरविण्यात यावी. स्थानिकांच्या वारसदारांना प्रशिक्षण देण्यात येऊन मे. वे.को.लि.च्या धरतीवर रोजगाराची संधी देण्यात यावी व बाहेरच्या व्यक्तींना रोजगार देऊ नये. शेतकऱ्यांना सूचना देऊन त्यांची जमीन प्रथम खरेदी करावी व नंतर उत्खनन करावे. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | प्रकल्प प्रवर्तकांनी नविन जागा खरेदी करताना त्यावरील कर हा मुकुटबन ग्रामपंचायतीस त्वरित भरावा. शेतक-यांना एकरी ₹ २५/- लाख मोबदला देण्यात यावा व शेतकरी, जिल्हा प्रशासन व संबंधित प्रकल्प प्रवर्तक यांच्यात परस्पर सांमजस्य करार करण्यात यावा. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | कोळशाची वाहतुक करताना काही अपघात झाल्यास त्यास प्रकल्प प्रवर्तक जबाबदार राहिल. कोळसा वाहतूकीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.<br>गावासाठी सीएसआर फंडातून किती पैसा खर्च करणार याबाबत उद्योगाने लेखी द्यावे.<br>खाण १८ वर्षांनंतर बंद झाल्यास नौकरी करणाऱ्यांना पुढील ३८ वर्षे पेन्शन देण्यात यावी. | सदर सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**२३)श्री गजानन बाबुरावजी बरशेट्टीवार, रा. मुकुटबन, ता. झरी-जामणी, जि. यवतमाळः-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मे. बिरला कंपनीने माझ्या शेतामध्ये अतिक्रमाण केले असून पोलिस कार्यवाहीची धमकी देतात. | अध्यक्षांनी, तहसिलदार यांना संबंधित बाबतीत लक्ष देऊन तोडगा काढण्याचे निर्देश दिले. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यातआलेल्यासूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिलामाळा, उद्योगभवन, रेल्वेस्टेशनरोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

**(प्रताप जगताप )**
समन्वयक, पर्यावरणविषयकक
जाहिर जनसुनावणी समिती तथा
उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि
मंडळ, चंद्रपूर

**(राजू वसावे)**
सदस्य, पर्यावरणविषयकक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा प्र. प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, चंद्रपूर

**(नरेन्द्र फुलझेले )**
अध्यक्ष, पर्यावरणविषयकक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी,
यवतमाळ